आमच्या तरुण मुलाचा मृत्यू स्वीकारणे आमच्यासाठी खूप कठीण होते, परंतु डॉक्टरांनी केलेल्या समुपदेशनामुळे आम्ही त्याचे अवयवदान करण्याचा आणि इतरांना जीवनदान देण्याचा निर्णय घेतला. आमचा मुलगा त्याच्या मृत्यूनंतरही जिवंत राहू शकतो, याची आम्हाला कल्पना आल्याने आम्ही अवयवदानाचा निर्णय घेतल्याची भावना मेंदू मृत मुलाच्या पालकांनी व्यक्त केली. मेंदू मृत रुग्णाला संसर्ग होण्याचा धोका अधिक असल्याने त्याची देखभाल करणे खूप कठीण असते. आई-वडील सत्य स्वीकारेपर्यंत तीन दिवस मुलाची निगा राखणे गरजेचे होते. मात्र डॉक्टर, परिचारिकांची उत्कृष्ट तुकडी आणि सुसज्ज अतिदक्षता विभागामुळे आम्हाला देखभाल करणे शक्य झाले. मुलाचे अवयव दान करण्याचा निर्णय हा कोणत्याही पालकांसाठी निश्चितच एक कठीण निर्णय आहे. त्यामुळे त्यांच्या वेदना कमी होत नसल्या तरी, या दुःखद प्रसंगातून त्यांना थोडा दिलासा मिळू शकेल, असे के.जे, सोमय्या रुग्णालय, मुख्य अतिदक्षता तज्ज्ञ, डॉ. गुंजन चंचलानी म्हणाल्या.

### पिंपरीतील ३७ बेकायदा जाहिरात फलक जमीनदोस्त

**पिंपरी :**

न्यायालयात प्रलंबित असलेल्या ४३३ बेकायदा लोखंडी जाहिरात फलक (होर्डिंग) व्यतिरिक्त पिंपरी-चिंचवड शहरात ७२ बेकायदा फलक आढळून आले आहेत. त्यापैकी ३७ फलक जमीनदोस्त झाले असून उर्वरित ३५ फलक दोन दिवसात काढण्यात येणार असल्याची माहिती आकाश चिन्ह आणि परवाना विभागाने दिली.

किवळे येथे (दि.१७) एप्रिल रोजी बेकायदा फलक कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला. तर तिघे जखमी झाले आहेत. या घटनेनंतर बेकायदा फलकांचा प्रश्न ऐरवणीर आला आहे. न्यायालयात प्रलंबित असलेल्या ४३३ बेकायदा फलकांव्यतिरिक्त ७२ नव्याने बेकायदा फलक आढळून आले आहेत. त्यापैकी ३३ फलकधारकांनी स्वतःहून फलक काढले आहेत. तर, पालिकेने चार फलक काढले आहेत. उर्वरित ३५ बेकायदा फलक येत्या दोन दिवसात काढण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले आहे. ज्या फलकांचे मंजुर मोजमापापेक्षा जास्त मोजमाप असल्यास त्यांनीही त्वरीत वाढीव मोजमाप स्वतःहून काढून घ्यावे. अन्यथा फलक बेकायदा गृहित धरून कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



## ब्रिजभूषण यांची नार्को टेस्ट करण्याची कुस्तीपटूंची मागणी

**नवी दिल्ली :**

भारताचे ऑलिम्पिक पदक विजेते कुस्तीपटू बजरंग पुनिया, साक्षी मलिक आणि दोन वेळा वर्ल्ड चॅम्पियन झालेली विनेश फोगाट यांनी पुन्हा एकदा भारतीय कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष ब्रिजभुषण शरण सिंह यांच्याविरूद्ध जंतर मंतरवर धरणे आंदोलन सुरू केले आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात याच कुस्तीपटूंनी ब्रिजभुषण यांच्याविरूद्ध महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याचा आरोप करत धरणे आंदोलन केले होते. त्यावेळी केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने मध्यस्थी करत एक चौकशी समिती नेमली होती. त्यानंतर हे आंदोलन स्थगित केले होते.

याच कुस्तीपटूंनी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यात उपसत ब्रिजभुषण सिंह यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी केली. विनेश फोगाटने सांगितले की जी चौकशी समिती स्थापन केली होती. त्यातील लोकांची राजनैतिक स्वरूपात एकमेकांशी मिलीभगत आहे. आता आम्ही जगणार आणि मरणार देखील जंतर मंतरवरच, देशालाही कळलं पाहिजे की आमच्यासोबत काय झालं आहे.

फोगाट पुढे म्हणाली की भारताचे ऑलिम्पिकमध्ये प्रतिनिधित्व केलेली आणि कॉमनवेल्थमध्ये सुवर्ण पदक जिंकलेले खेळाडू जर देशात सुरक्षित नसतील तर इतर महिलांची काय स्थिती असेल यावर आपण काय सांगू शकतो. आता जोपर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत जंतर मंतरवरून हलणार नाही असेही सांगितले.

दुसरीकडे ऑलिम्पिक पदक विजेत्या साक्षी मलिकने सांगितले की, आम्ही दोन दिवसांपूर्वी कनॉट प्लेस पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र या प्रकरणी अजून एफआयआर दाखल झालेली नाही. ७ मुलींनी ही तक्रार दाखल केली होती. यातील एक मुलगी अल्पवयीन आहे. पोलीस एफआयआर दाखल करून घेत नाहीये आम्हाला सरकारकडून मदतीची अपेक्षा होती. मात्र असं काही झालं नाही. बजरंग पुनियाने सांगितले की फेडरेशन तर जसं आधी सुरू होतं तसं आताही सुरू आहे.

नॅशनल स्पर्धा देखली होत आहे. याचा अर्थ आम्ही जे आंदोलनाला बसलो होतो ते सगळं खोटं होतं. आता आम्ही स्पष्ट सांगितले आहे की यावर तोडगा निघत नाही तोपर्यंत आम्ही कुस्तीपटू आंदोलन करणार आहोत.

# आता शिर्डीतील लूटमार थांबणार!

## साईभक्तांसाठी संस्थानने घेतला मोठा निर्णय

**शिर्डी :**

शिर्डी येथील साईबाबा मंदिरात जगभरातून भाविक दर्शनासाठी येत असतात. दरदिवशी मोठ्या संख्येने भाविक शिर्डी येथे साईचरणी लीन होतात. या साईभक्तांना साई मंदिरात जाताना आता हार, फुल, प्रसाद नेता येणार आहे. तसेच याठिकाणी होणारी भक्तांची लूटमार थांबवण्यासाठी साई संस्थानमार्फत भाविकांना रास्त दरात हार-फुलांची विक्री केली जाणार आहे.

साईबाबा संस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने ठराव करत साई मंदिरात भाविकांना हार फुल प्रसाद घेऊन जाण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच साई संस्थानमार्फत भाविकांना रास्त दरात फुलांची विक्री केली जाणार आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांकडून खरेदी करून मंदिराच्या प्रांगणात भाविकांना फुले उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. त्यामुळे साईभक्तांची लूट थांबवून आता शेतकऱ्यांना देखील दिलासा मिळणार आहे. दरवर्षी शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी कोट्यावधी भाविक येत असतात. दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या श्रद्धेचा आणि भावनांचा आधार घेत व्यावसायिक तसेच विक्रेते हार, फुले आणि प्रसाद अशा पुजा साहित्याच्या माध्यमातून त्यांना आर्थिक लुबाडतात. दोनशे रुपयांची फुल माळा दीड ते दोन हजार रुपयांना विकून भाविकांची लूट करतात. अशा अनेक तक्रारी साई संस्थानकडे



आल्या होत्या. याची गंभीर दखल घेत आता साई संस्थानमार्फत भाविकांना रास्त दरात फुलांची विक्री केली जाणार असल्याने भाविकांची होणारी लूट आता थांबणार आहे.


**नमुना पी ९**

**जाहीर निवेदन**

**इन्सॉल्व्हन्सी व बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (भारतीय नादारी दिवाळीखोरी मंडळ) यांच्या नियम १९ (२) खाली प्री-पॅकेज्ड इन्सॉल्व्हन्सी रिझोल्यूशन प्रोसेस (पूर्व गठित दिवाळखोरी निर्णय प्रक्रिया) नियम २०२१ प्रमाणे**

**सुदाल इंडस्ट्रीज लिमिटेडच्या घेणेकऱ्यांचे (धनको) लक्ष वेधण्यासाठी**

याद्वारे सूचना देण्यात येते की, मे न्यायिक अधिकारी (Adjudicating Authority) मुंबई न्यायपीठ यांनी दि.२०-०४-२०२३ रोजी सुदाल इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या पूर्व गठित (प्री पॅकेज्ड) दिवाळखोरी निर्णय प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**संबंधित तपशील**

| I | II | III |
|---|---|---|
| २ | ऋणको कंपनी (कॉर्पोरेट डेटर) चे नाव | सुदाल इंडस्ट्रीज लिमिटेड |
| २ | पूर्वीची नावे गत दोन वर्षात बदलली असल्यास | लागू नाही |
| ३ | ऋणको कंपनी (कॉर्पोरेट डेटर) स्थापना/ नोंदणी | ०८-०८-१९७९ |
| ४ | ऋणको कंपनी (कॉर्पोरेट डेटर) जिथे नोंदलेली आहे त्या अधिकृत नोंदणीदाराचे नाव | रजिस्ट्रार ऑफ कंपनीज्, मुंबई |
| ५ | ओळख क्रमांक (आयडेंटिफिकेशन नंबर) | L21541MH1979PLC021541 |
| ६ | ऋणको कंपनी (कॉर्पोरेट डेटर) नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | नोंदणीकृत कार्यालय: अे-५, एमआयडीसी, अंबड औद्योगिक वसाहत, मुंबई-नाशिक महामार्ग, नाशिक ४२२०१०, महाराष्ट्र. भारत<br>कॉर्पोरेट कार्यालय: २६ अे, नरीमन भवन, २२७, नरीमन पाईंट, मुंबई ४०००२१ महाराष्ट्र, भारत. |
| ७ | पूर्व गठित दिवाळखोरी प्रारंभ तारीख | २०-४-२०२३ (खालील सही करणार यांना दि.२०-४-२०२३ चा आदेश २२-०४-२०२३ रोजी प्राप्त झाला.) |
| ८ | निर्णय व्यावसायिकांचे (resolution professional) मंडळाकडे नोंदलेले नाव व क्रमांक | प्रशांत जैन<br>नोंदणी क्र. BBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12I131 |
| ९ | निर्णय व्यावसायिकांचे (resolution professional) मंडळाकडे नोंदलेले ई मेल ID व पत्ता | नोंदणीकृत पत्ता-A-501, शांती हाईटस् प्लॉट क्रमांक २,३,९ B/10, सेक्टर ११, कोपरखैरणे, ठाणे, नवी मुंबई. महाराष्ट्र-४००७०९.<br>नोंदणीकृत ई-मेल: ipprashantjain@gmail.com |
| १० | निर्णय व्यावसायिक (resolution professional) यांचेशी संपर्कासाठी उपयोग करण्याचा पत्ता व ई-मेल | पत्रव्यवहार पत्ता: एसएसअेआरव्हीआय रिझोल्यूशन सर्व्हिसेस, LLP-IPE, बीएसईएल, टेक पार्क, सेक्टर ३० अे, वाशी रेल्वे स्थानकासमोर, वाशी, नवी मुंबई-४००७०३.<br>संपर्क ई मेल-sudal.ppirp@gmail.com |
| ११ | दावेदारांची यादी दि.२४-०४-२०२१ पासून येथे उपलब्ध असेल. | सीडी यांची वेबसाईट, http://sudal.co.in/<br>आयपीई यांची वेबसाईट: http://ssarvi.com/running-cases.php |

दि.२४-०४.२०२३

स्थळ: मुंबई

सही-


श्री.प्रशांत जैन

नोंदणी क्र. BBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131

# खगोल भौतिकशास्त्रज्ञ व संसद सदस्य मेघनाद साहा

**मेघनाद साहा यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रफुलचंद्र रॉय व सर जगदीशचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन १९१५ मध्ये एम. एस्सी. आणि नंतर सापेक्षता सिद्धांत व प्रारण दाबाचे मापन या विषयांवर संशोधन करून पीएच. डी. पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी लंडनच्या इंपिरियल कॉलेजमध्ये संशोधन करून डी. एस्सी. पदवी मिळविली. ते कोलकाता विद्यापीठात भौतिकी विषयाचे खैरा प्राध्यापक (१९२१-२३), पलित प्राध्यापक (१९३८-५२) आणि गुणश्री प्राध्यापक (१९५२-५६) तसेच अलाहाबाद विद्यापीठात भौतिकीचे प्राध्यापक (१९२३-३८) होते.**

साहा यांनी आणवीय सिद्धांत आणि पुंजयामिकी यांमधील तत्त्वांचा वापर करून तारकेय वर्णपटांच्या चित्रलिपीचा




सांकेतिक अर्थ शोधून काढण्याकरिता सर्वप्रथम प्रयत्न केला. तारकेय वातावरणातील तापमानाला (६,०००ओ से. किंवा अधिक) ताऱ्याचे घटक असलेल्या पुष्कळशा अणूंच्या बाह्य कवचातील इलेक्ट्रॉन छेदले जातात. या आणवीय छेदन प्रक्रियेला इलेक्ट्रॉन गमावल्यामुळे आयनीकरण म्हणतात आणि छेदित अणूला आयन (विद्युत्भारित अणू) म्हणतात. अशा प्रकारे तारकेय वातावरणात मुक्त इलेक्ट्रॉन आणि छेदित अणू यांचे वायुमय मिश्रण असते.

साहा यांनी या मिश्रणास वायूचा गत्यात्मक सिद्धांत आणि ऊष्मागतिकी यांचे नियम लावले. कोणत्याही मूलद्रव्याच्या अणुंकरिता छेदन किंवा आयनीभवन केवळ उच्च तापमानामुळे घडून येत नसून ते नीच दाबामुळे सुद्धा घडते, हे साहा यांनी सप्रमाण सिद्ध केले. दाबातील न्यूनीकरणामुळे छेदन झाल्यानंतर उरलेला अणू आणि मुक्त इलेक्ट्रॉन यांची गाठ पडण्याची संधी अधिक कमी होते आणि पुनःसंयोग होण्याचा वेग कमी होऊन आयनीकरण वेग बदलत नाही. साहा



समीकरण हे या कल्पनांचे गणितीय रूप आहे. मेघनाद साहा यांचे १६ फेब्रुवारी १९५६ रोजी निधन झाले.



## सोलापूरच्या पेपर मिल कारखान्याला भीषण आग

■ सोलापूर

**शहरातील** आप्पासाहेब पाटील, श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या बाजूला असलेल्या पेपर मिल कारखान्याला रविवारी सकाळच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आगीची माहिती मिळताच सोलापूर महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाच्या पाच गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून, पाण्याचा मारा केल्यानंतर तासाभरानंतर आग आटोक्यात आली. सिध्देश्वर साखर कारखान्याशेजारीच पेपर मिल कारखाना आहे. या कारखान्यात शेकडो टनाचे पेपर व पुठ्ठे ठेवण्यात आले होते. अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत हजारो रूपयांचे पुठ्ठे जळून खाक झाले. कारखान्यातील कर्मचारी, अधिकारी यांनीही आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

# पालकमंत्री गुलाबराव पाटलांनी २ लाखांचे व्हेंटिलेटर १५ लाख रुपयांना खरेदी केले

■ मुंबई



### खासदार संजय राऊत यांचा गंभीर आरोप

**ठाकरे** गटाचे खासदार संजय राऊतांनी आज जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटलांवर कोरोना काळात भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप केला. संजय राऊत म्हणाले की. 'कोरोना काळात पालकमंत्री आणि जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी चढ्या भावात वस्तूंची खरेदी केली होती. यामध्ये ऑक्सिजन व्हेंटिलेटर्सचाही समावेश होता. त्यावेळी २ लाखांचे व्हेंटिलेटर १५ लाखांना खरेदी केले गेले. आपल्या जिल्ह्यातील रुग्णांचे जीव वाचवण्यापेक्षा गुलाबराव पाटील हे प्रत्येकावर दबाव आणून खरेदी करुन घेत होते.

संजय राऊत म्हणाले की, 'मी गृहमंत्री झाल्याने काही लोकांच्या अडचणी वाढल्या असल्याचे फडणवीस म्हणत असतील तर त्यांचा हा गैरसमज आहे. कारण फडणवीस गृहमंत्री झाल्याने भ्रष्टाचारी, लफंगे, लुटमारी करणारे खुश झाले आहेत. आपला बाप आला असे त्यांना वाटत आहे. राहुल कुल यांच्या ५०० कोटींचे प्रकरण पुराव्यासकट आणि ऑडिट रिपोर्टसह मी त्यांच्याकडे पाठवले. शेतकऱ्यांचे पैसे कसे लुटले याबाबत पुरावे दिले. मात्र गृहमंत्र्यांनी काय केले, त्यांना कोण घाबरत आहे. तर फडणवीसांकडून हे प्रकरण दाबले जात आहे. तसेच शिंदे गटाचे दादा भुसेंनी तेरणा सहकारी साखर कारखान्यात १८०० कोटींचा भ्रष्टाचार केला. काय झाले त्या पैशांचे. त्यावर देखील फडणवीसांनी काय केले. आता मी मुंबईला गेल्यावर गुलाबराव पाटलांच्या भ्रष्टाचाराची कागदपत्रे फडणवीसांना पाठवणार आहे. पुढे संजय राऊत म्हणाले की, 'किरीट सोमय्यांकडे देखील हे प्रकरण पाठवले. महाविकास आघाडीच्या काळात तुरुंगात घालणार असे म्हणणारे सोमय्या आता त्यांना कधी तुरुंगात पाठवणार आहे. हे पण घोटाळे आहे, तीर्थयात्रा थोडी आहे. भ्रष्टाचार हा भ्रष्टाचार असतो. तुमच्या लोकांनी केला म्हणजे शिष्टाचार आणि दुसऱ्यांवर केलेले आरोप म्हणजे भ्रष्टाचार असे होत नाही, अशी टीका राऊत यांनी सोमय्यांवर केली आहे.

## अभिहस्तांतरण विषयावर मोफत मार्गदर्शन शिबिर

**मुंबई-** अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) या विषयावर निवारा पी.एम.सी. यांनी मुंबईसह उपनगरातील गृहनिर्माण सोसायट्यांसाठी मोफत मार्गदर्शन शिबिर बोरिवली (पूर्व) दत्त पाडा, राजेंद्र नगर येथे शनिवार २९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आयोजित केले आहे.

या शिबिरात अभिहस्तारण विषयावर जिल्हा उपनिबंधकासह कायदेतज्ज्ञ, आर्किटेक मंडळी मार्गदर्शन करणार आहेत. तरी गृहनिर्माण सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन निवारा पी.एम.सी.चे अध्यक्ष मधूकर गोमणे यांनी केले आहे.


### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या नोटीस द्वारे कळविण्यात येते की आम्ही में. विजय मशिनरी स्टोअर्स/ विजय इंडस्ट्रीज अँड प्रोजेक्टस लि. निम्नस्वाक्षरीकर्ते जाहिर करतो की सदर मिळकत में. विजय मशिनरी स्टोअर्स/ विजय इंडस्ट्रीज अँड प्रोजेक्ट्स लि. प्लॉट न. सी – ३५, चांदिवली व्हिलेज, साकीविहार रोड, चांदिवली, मुंबई ४०००७२, सर्वे क्र.१०/७, ११/१,११/३ मौजे चांदिवली. वां सिटी सर्वे क्र. २९/क, ३०/अ/१/६ असे एकूण ४८४९ चौ. मी. चे औद्योगिक किंवा व्यवासायिक विकास करण्याचे योजिले आहे. त्याकरिता आम्ही संबंधित कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचेकडे कामगार थकबाकी नसल्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी कोणी कामगार/मजूर/कामगार संघटना/इतर संघ वा इतर कोणत्याही व्यक्तीचा दावा / मागणी / काही भार / अधिकार / हितसंबंध किंवा कोणत्याही प्रकारचे हक्क सदर मिळकतीवर असल्यास त्यांनी तसे कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पूर्व), कामगार आयुक्त यांचे कार्यालय कॉमर्स सेन्टर, ताडदेव, मुंबई किंवा कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांचेकडे या सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसात अशा दाव्याबद्दल सर्व साधार कागदपत्रांसह कळवीणे आवश्यक आहे. कसूर केल्यास अशा दाव्याची दखल न घेता अशा व्यक्ती / कामगार/मजूर/कामगार संघटना /इतर संघ यांनी ते हक्क सोडलेले आहेत व ते आमच्यावर बंधनकारक नाहीत असे समजून पुढील कार्यवाही करू.

**में. विजय मशिनरी स्टोअर्स/**
**विजय इंडस्ट्रीज अँड प्रोजेक्ट्स लि.**
**सही/ –**
**व्यवस्थापकीय संचालक**


# आता पाण्याखालीही धावणार मेट्रो केरळमध्ये मोदींच्या हस्ते उद्घाटन

### २५ एप्रिलपासून सुरु होणार

■ कोची

**आता** भारतात आगळीवेगळी मेट्रो ट्रेन धावणार आहे. ही मेट्रो इतर मेट्रोपेक्षा फार वेगळी आहे. कारण ही मेट्रो ट्रॅकवर नाही तर पाण्यात धावणार आहे. या अंडर वॉटर मेट्रोचे उद्घाटन केरळमधील कोची येथे २५ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. ही मेट्रो कोचीमधील विविध स्थळांना जोडली जाणार आहे.

बंदरगाह शहरात ११३६ कोटी रुपये खर्च करून ही मेट्रो तयार करण्यात आली आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी या मेट्रोला राज्याचे 'ड्रिम प्रोजेक्ट' म्हटले आहे. कोची हे केरळमधील दाट लोकवस्तीचे शहर आहे. येथील दाट लोकवस्तीच्या शहरात गर्दी कमी करण्यासाठी आणि कोचीच्या किनाऱ्यावर सहज पोहोचण्यासाठी वाहतुकीची ही नवी संकल्पना साकार करण्यात आली आहे. पाण्यातील मेट्रोचा हा मार्ग ७८ किलोमीटरचा आहे. या मार्गावर १५ स्थानके आहेत. ही संकल्पना आधुनिक, पर्यावरण पूरक तसेच प्रवाशांना सुखद अनुभव देणारी असणार आहे. प्रवासी कोची- १ कार्डाचा वापर करून कोची मेट्रो आणि वॉटर मेट्रो या दोन्हीमध्ये प्रवास करू शकतील. डिजिटल स्वरुपात देखील याचे तिकीट काढता येईल.

# रेल्वे यार्डातील माथाडी कामगारांना तत्काळ सुविधा देण्याच्या सूचना

■ मुंबई

**मध्य** व पश्चिम रेल्वेच्या विविध माल धक्क्यावरील माथाडी कामगार व अन्य घटकांसाठी विश्रांतीगृह, पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालय, प्लॅटफॉर्म व रस्ते दुरुस्ती, दिवाबत्तीची सोय आदी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिल्या.

विविध रेल्वे यार्डात पिण्याच्या पाणी, विश्रांतीगृह, शौचालय, प्लॅटफॉर्म व रस्ते दुरुस्ती आदी सुविधांचा अभाव असून, त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने रेल्वे प्रशासन व कामगार मंत्री यांचेकडे निवेदने सादर केली होती. त्यासंदर्भात राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी मंत्रालयात संयुक्त बैठक आयोजित केली होती. त्यावेळी या सूचना केल्या. या बैठकिस महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष एकनाथ जाधव, जनसंपर्क अधिकारी पोपटराव देशमुख, सेक्रेटरी कृष्णा पाटील, प्रशांत सणस, संजय चोरमले, महाराष्ट्र राज्याचे कामगार विभागाच्या प्रधान सचिव वनिता सिंघल, कामगार आयुक्त सतीश देशमुख, सह कामगार आयुक्त (माथाडी) व्ही. के. बुवा, मध्य रेल्वेचे सहाय्यक वाणिज्य प्रबंधक चंद्रकांत पगारे आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. दरम्यान त्यासंदर्भात कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी संयुक्त बैठक घेऊन दिलेल्या सूचनांबद्दल या युनियनचे नेते माजी आमदार नरेंद्र पाटील व इतर पदाधिकाऱ्यांनी आभार व्यक्त केले आहे.


### जाहीर नोटिस

सर्वांना कळवण्यात येते की, श्री नरेंद्र दयालाल रावल व श्रीमती सुशीला नरेंद्र रावल हे फ्लॅट नं. बी-३०९, शांती गंगा बिल्डिंग, न्यू शांतीगंगा को-ओप. हाऊसिंग सोसायटी, रेल्वे स्टेशन समोर, भाईंदर (पुर्व) जिल्हा ठाणे (सदर फ्लॅट) चे मालक होते. श्री नरेंद्र दयालाल रावल हे दिनांक १०.११.२०१८ रोजी मृत्यूपत्र न करता मयत झाले असून त्यांना वारस म्हणून सुशीला नरेंद्र रावल (पत्नी), श्री निलेश नरेंद्र रावल (मुलगा), श्री अल्पेश नरेंद्र रावल (मुलगा) आणि श्रीमती फाल्गुनी सुनील रावल (विवाहित मुलगी) हेच वारस आहेत. दिनांक १५.०३.२०२३ रोजीच्या नोंदणीकृत (टनन-७-४८६२-२०२३) कराराने सुशीला नरेंद्र रावल, श्री निलेश नरेंद्र रावल, श्री अल्पेश नरेंद्र रावल आणि श्रीमती फाल्गुनी सुनील रावल यांनी सदर फ्लॅट माझे अशील श्री दिपक अशोक अग्रवाल यांना विक्री करण्याचे मान्य व कबूल केले असून, सदर फ्लॅट चा ताबा सुद्धा माझे अशीलास दिला आहे. कोणत्याही व्यक्तीला सदर फ्लॅट बाबत हक्क, अधिकार, वारस हक्क, लीज, करार, हुकूम, वा इतर कोणत्याही मार्गे हक्क, नामाधिकार वा दावा असल्यास वा कुणाचीही नरेंद्र दयालाल रावल यांचे वारसा बाबत हरकत असल्यास, त्यांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत सर्व कागदपत्री पुराव्यानिशी माझे पत्त्यावर म्हणजे फ्लॅट नं. ए/०८, शीतलछाया, गणपती मंदीरासमोर, शीतल नगर, मीरा रोड (पूर्व) जिल्हा ठाणे ४०११०७ येथे लेखी कळवणे आवश्यक आहे. नमूद मुदतीमध्ये कुठलीही हरकत आली नाही वा कुणीही दावा केला नाही तर वरील बाबी करीता कुणाचीही हरकत वा दावा नाही असे समजण्यात येईल.

अँड. सारिका लड्डा


# अतिकने बळकावलेल्या जमिनी आणि घरे मूळ मालकांना सरकार परत देणार



■ लखनऊ

**कुख्यात** गँगस्टर अतिक अहमदच्या ताब्यातील जमीन आणि घरे पीडित मूळ मालकांना परत करण्याचा विचार योगी आदित्यनाथ सरकारकडून करण्यात येत आहे. त्यासाठी राज्य सरकार एक आयोग स्थापन करणार आहे. त्या आयोगाच्या अहवालावरून ताब्यात घेतलेल्या जमिनी परत करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. माफिया अतीक आणि त्याचा भाऊ अशरफ यांनी प्रयागराजसह अनेक शहरांमध्ये दादागिरी करून जमिनी बळकावल्या होत्या किंवा त्या लोकांकडून कवडीमोल भावाने घेतल्या होत्या.

योगी सरकार माफियांनी बळकावलेल्या जागा चिन्हांकित करून त्या लोकांना परत करण्याचा विचार करत आहे.

# बुधवार पेठेत भीषण आग! जुना वाडा जळून खाक

■ पुणे

**मागील** काही दिवसांपासून पुण्यात आगीच्या घटना वाढल्या आहेत. आज पुण्याच्या बुधवार पेठेतील श्रीनाथ सिनेमा गृहाजवळ असलेल्या एका लाकडी वाड्याला आग लागून, हा वाडा पूर्णपणे जळून खाक झाला. सुदैवाने या आगीत जीवितहानी मात्र झाली नाही. बुधवार पेठेत अनेक लाकडी वाडे आहेत. त्यातील श्रीनाथ थियेटर जवळच्या लाकडी वाड्याला आग लागली आणि ही आग झपाट्याने सर्वत्र पसरली त्यामुळे लोकांमध्ये घबराट माजली. दरम्यान या आगीचे वृत्त समजताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग

निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सी.आर.वाडीया आरोग्य केंद्र येथील मध्यवर्ती प्रयोगशाळा तसेच इतर PERIPHERAL प्रयोगशाळांकरीता रिर्पोटिंग करीता सॉफ्टवेअर उपलब्ध करुन घेणेस ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि. २४/०४/२०२३ ते दि. ०२/०५/२०२३ पर्यत संध्याकाळी १६.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील. दि.०२/०५/२०२३ रोजी संध्याकाळी १६.०० वाजेपर्यत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि.०३/०५/२०२३ रोजी संध्याकाळी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/९९/२०२३-२४ **सही/-**

दि:२१.०४.२०२३ उप आयुक्त (आरोग्य)

*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे

*www.thanecity.gov.in*

**महापालिकेचा मालमत्ता कर Google pay, PhonePe, Paytm, Bhim App द्वारे जमा करण्याची सुविधा उपलब्ध**


# संक्रमण शिबिरातील खोल्यांचे १२५ कोटी थकीत भाडे वसुली अभावी म्हाडा हतबल



■ मुंबई

**मुंबईतील** म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील खोल्यांमध्ये राहाणाऱ्या काही रहिवाशांनी वर्षानुवर्षे भाडे भरलेले नाही. ही थकीत भाड्याची रक्कम १२५ कोटी रुपये झाली आहे. ही रक्कम वसूल कशी करायची याबाबत म्हाडा अक्षरशः हतबल आहे, अशी धक्कादायक माहिती मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातील उपमुख्य अधिकारी कार्यालयातून देण्यात आली आहे.

बैठी ५६ संक्रमण शिबिरे असून त्यामध्ये २१ हजार १३५ खोल्या आहेत. सन् २०१० मध्ये म्हाडाने सर्व खोल्यांची तपासणी केली होती. यावेळी ८,४४८ खोल्यांमध्ये घुसखोरी झाल्याचे आढळून आले. संक्रमण शिबिरात अधिकृत रहिवाशांकडून म्हाडा दरमहा पाचशे रुपये भाडे घेते. तर घुसखोरांकडून दरमहा तीन हजार रुपये भाडे आकारले जाते. यातील काही लोकांनी बरेच वर्ष भाडे भरलेले नाही. ही थकीत भाड्याची रक्कम १२५ कोटी रुपयांच्या आसपास पोहोचली आहे. ही रक्कम वसूल कशी करायची हे म्हाडा समोर आव्हान आहे, असे उपमुख्य अधिकारी कार्यालयाचे म्हणणे आहे.


## नवी मुंबई महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्र-नमुंमपा/कार्यकारी अभियंता(कोपरखैरणे)/33/2023**

| क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | कोपरखैरणे विभागातील नोडल क्षेत्रातील विविध ठिकाणी नमुंमपा विदयुत विभागाने पथदिव्यांसाठी खोदलेल्या चरांचे पुर्नपृष्ठीकरण करणे. (86730) | 2,31,92,531/- |
| 2 | नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत कोपरखैरणे विभागातील हनुमाननगर, महापे परिसरात गटारासह पदपथाची सुधारणा करणे. (82755) | 47,29,310/- |
| 3 | कोपरखैरणे विभागातील बोनकोडे गांवातील रस्त्याची TWT ने सुधारणा करणे.(86692) | 2,43,49,467/- |
| 4 | कोपरखैरणे विभागातील सेक्टर-1ए येथील नाल्याची सुधारणा करणे.(86515) | 1,89,99,508/- |
| 5 | कोपरखैरणे विभागातील पावणे गांवातील रस्त्याची TWT ने सुधारणा करणे.(86688) | 1,58,38,680/- |
| 6 | कोपरखैरणे टीटीसी औदयोगिक क्षेत्रातील विविध ठिकाणी नमुंमपा विदयुत विभागाने पथदिव्यांसाठी खोदलेल्या चरांचे पुर्नपृष्ठीकरण करणे.(86718) | 73,11,581/- |
| 7 | कोपरखैरणे महापे औदयोगिक क्षेत्रातील प्लॉट नं. ए-606 ते लोकमत प्रेस पर्यंत रस्त्याची व पदपथाची सुधारणा करणे.(86722) | 1,42,08,479/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणकप्रणालीच्या https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर व नमुंमपाच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 24/04/2023 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-

**शहर अभियंता**

**जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/68/2023 नवी मुंबई महानगरपालिका**



### फॉर्म पी9
### जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०२१ च्या विनियमन १९(२) अन्वये)

**सुदल इंडस्ट्रीज लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, निर्णय अधिकारी, मुंबई खंडपीठ यांनी **सुदल इंडस्ट्रिज लिमिटेड**करिता प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याकरिता **दि. २०.०४.२०२३** रोजी आदेश दिला आहेत.

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| I | II | III |
| १. | कॉर्पोरेट धनकोचे नाव | **सुदल इंडस्ट्रीज लिमिटेड** |
| २. | पूर्वीचे नाव, जर गत दोन वर्षात बदलले असल्यास | लागू नाही |
| ३. | कॉर्पोरेट धनकोच्या स्थापनेचा दिनांक | ०८.०८.१९७९ |
| ४. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट धनकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी-मुंबई |
| ५. | ओळख क्रमांक | L21541MH1979PLC021541 |
| ६. | कॉर्पोरेट धनकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | **नोंद. कार्यालयः** ए-५, एमआयडीसी, अंबड इंडस्ट्रियल एरिया, मुंबई - नाशिक हायवे, नाशिक-४२२०१०, महाराष्ट्र, भारत. **कॉर्पोरेट कार्यालयः** २६ए, नरिमन भवन, २२७ नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ महाराष्ट्र, भारत. |
| ७. | प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | २०.०४.२०२३ (आदेश दिनांक २०.०४.२०२३ निम्नस्वाक्षरीकारांना दि. २२.०४.२०२३ रोजी प्राप्त) |
| ८. | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **प्रशांत जैन** **नोंद. क्र.** IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | नोंद. पत्ताः ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९, बी/१०, सेक्टर ११, कोपरखैरणे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४०० ७०९. नोंद. ई-मेलः ipprashantjain@gmail.com |
| १०. | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहाराचा पत्ताः** स्सार्वी रेझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी-आयपीई, बी६१०, बीएसईएल टेक पार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्टेशनसमोर, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. पत्रव्यवहाराचा ई-मेलः sudal.ppirp@gmail.com |
| ११. | दाव्यांची यादी दि. २४.०४.२०२३ पासून येथे उपलब्ध करून देण्यात येईलः | **सीडी यांची वेबसाईटः** https://sudal.co.in/ **आयपीई यांची वेबसाईटः** http://ssarvi.com/running-cases.php |

सही/-

**दिनांकः २४.०४.२०२३** **श्री. प्रशांत जैन**

**ठिकाणः मुंबई** **नोंद क्र.** IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131


## अक्षय गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ उल्हासनगर

**उल्हासनगर** शहरासह आजूबाजूच्या परिसरात तब्बल १८ गंभीर गुन्ह्यांची नोंद असलेला अक्षय उर्फ बाबू गायकवाड याला उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. एका व्यापाऱ्याला रिव्हॉल्वरचा धाक दाखवून धमकावत पैसे उकळण्याचा तसेच खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल आहे. उल्हासनगरमधील व्यापारी विक्की वलेचा याला रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून मारहाण करत खंडणीसाठी धमकावल्याचा प्रकार समोर आला आहे. विक्की वलेचा हा उल्हासनगरमधील गोल्ड मेकर व्यापारी आहे.


## TENDER NOTICE

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

| Sr. No. | (Tender NO) / estimated Amt./Tender form fee/EMD Amt./Name of work | Sale period of tender Online Only | Submission due date Online Only |
|---|---|---|---|
| 1 | (SE/KC-II/HR/OS/2023-24/T-03)/ Limited to Rs. 4,42,90,706/- /Rs. 5,900/- Rs. 2,21,454/- Providing Outsourced Skilled & Unskilled Manpower under Kalyan Rural Division. | From Dt. 24.04.2023 to 08.05.2023 | Dt. 08.05.2023 to 15.00 Hrs |

Tenders are invited from eligible bidders for following works by **E-tendering method** The bidders are requested to get registered for e-tendering procedure.

**Contact Person -** Executive Engineer (Adm.), Kalyan circle -II, **Tel No.** 0251-2328283-Ext No. 302, Mob:EE(Adm) 8879626969. **Add: M.S.E.D.C.Ltd.**, Kalyan Circle-II (O&M), Tejshree Build., Third Floor, Kalyan (W) - 421 301
**Email -** sekalyan2@gmail.com, **Website -** www.mahadiscom.in



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन(पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेलः- **coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in** वेबसाईट :- **http://kbmc.gov.in**

जा.क्र.:कुबनप/साबां/१३८/२०२३-२०२४ दिनांकः २१/०४/२०२३

**फेर निविदा सूचना क्र.१२**

कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत नगरपरिषदेच्या जागाची मोजणी करणे, नकाशे प्रमाणित करणे व सिमांकन करणे या कामासाठी ३ वर्षाकरिता दर करार करणेसाठी, अनुभवी व ठेकेदार/पुरवठा यांचेकडून बाबनिहाय (Item Rate) ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २४/०४/२०२३ ते दि. ०२/०५/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि. ०३/०५/२०२३ रोजी सकाळी १०.०० नंतर उघडण्यात येतील. निविदा फॉर्म फी रु. ११८०/- इतकी असून बयाणा रक्कम रु.१,५०,०००/- ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
**(योगेश गोडसे)**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**